# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Political Science

## Assignment

## Session: 2021 – 2022

2021-2022

Name : Rasika N. Ruikar

std :- B. A. 2nd IV sem

sub : Political science Assienment

college Name : Yoshoda Girl's Art's and commerce College.

2021-22

SEAL

Principal
Yashoda Girls Arts & Commerce College, Sneh Nagar, Nagpur-15

1] केंद्र व राज्य यांच्यातील संबंध स्पष्ट करा. ?

⟹ राज्यघटनेच्या 19 व्या भागातील कलम 245 ते 290 मध्ये केंद्र व राज्य यांच्यातील संबंधाचे वर्णन केले आहे. राज्यघटनेत केंद्र व राज्यांतील आपसातील संबंधाचा विचार पुढीलप्रमाणे करता येतो.

अ] प्रशासकीय संबंध :

केंद्र आणि राज्य यांच्यातील प्रशासकीय कलम 256 ते 263 मध्ये करण्यात आले आहे. केंद्र व राज्य यांच्यातील प्रशासकीय संबंधाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येते.

1] राज्यांचे कर्तव्य :

केंद्र सरकारने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी संपूर्ण देशात करता यावी व त्यात कोणत्याही प्रकारचे अडथळे येऊ नये अशा पद्धतीने राज्यांची आपली कार्यकारी सत्ता वापरावी असे निर्देश व सुचना केंद्र सरकार राज्यांना देऊ शकते. त्या निर्देशांचे व सुचनांचे पालन करणे हे राज्यांचे कर्तव्य असते. केंद्र सरकारच्या निर्देशाचे एखादे राज्य पालन

करीत नसेल तर त्या राज्यात राष्ट्रपती राजवट लावण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे.

२] राज्यांना आदेश :

राष्ट्रीय दृष्टीने महत्वाचे मार्गी पुल, रेल्वे, दळणवळणाची निर्मिती ही कार्ये केंद्र सरकाराकडून केली जाते. परंतु अशा मार्गाने रक्षण व सुरक्षिततेसाठी आणि विशिष्ट उपाययोजना करण्यासाठी केंद्र सरकार राज्यांना आवश्यक ते आदेश देऊ शकते.

३] राज्यांकडे कार्य सोपविणे :

राज्य सरकारच्या संमतीने राष्ट्रपती केंद्र सरकारची काही कार्ये राज्य सरकारकडे सोपवू शकते केंद्र सरकारचे कायदे संपुर्ण देशात लागू करता यावे म्हणून केंद्र सरकार राज्यांकडे किंवा राज्यकर्मचाऱ्यांकडे ती कार्ये सोपवू शकतो केंद्राच्या आर्थिक मदतीवर राज्यांना अवलंबुन रहावे लागत असल्यामुळे राज्य सरकार सुद्धा केंद्र सरकारची अशी कार्ये करण्यास नकार देत नाही.

4) नद्यासंबंधी वाद सोडविणे :- एखादी नदी अनेक घटक राज्यातून वाहत असेल तर पाण्याच्या वाटपासंबंधी अनेक वेळा राज्या-राज्यांमध्ये वाद निर्माण होतात. संसदेला कायदे करून असे वाद सोडविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. नदिच्या पाण्याचा वापर, वितरण किंवा नियंत्रणासंबंधी विवादाच्या संदर्भात संसद कायदा करून किंवा मध्यस्थता करून त्याचे निराकरण करू शकते.

5) राज्यात शांतता :- एखाद्या राज्यातील शांतता व सुव्यवस्था टिकविण्यासाठी राज्य सरकारने विनंती केल्यास तेथे सेना व निमलष्करी दल पाठविण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे.

6) राज्यात राष्ट्रपती शासन :- एखाद्या घटक राज्यात राज्यघटनेनुसार शासनाकारभार चालविणे अशक्य आहे. असा अहवाल तेथील राज्यपालाने केंद्र सरकारने पाठविल्यास त्या अहवालाच्या आधारावर त्या राज्यात.

राष्ट्रपती राजवट घोषित करण्याचा अधिकार केंद्र सरकारला आहे.

7) राज्यपालाची नेमणूक :

भारतात राज्यांच्या राज्यपालाची नियुक्ती राष्ट्रपतीकडून केली जाते. आणि तो राज्यात केंद्राचा प्रतिनिधि म्हणून कार्ये करीत असतो. राज्यपालाच्या माध्यमातून केंद्र सरकार राज्यांच्या शासनावर नियंत्रण ठेवते.

8] अखिल भारतीय सेवा :

अखिल भारतीय सेवांच्या माध्यमातून केंद्र सरकार राज्य सरकारांवर नियंत्रण ठेवत असते. अखिल भारतीय सेवा व नोकऱ्या निर्माण करण्याचा अधिकार केंद्र सरकारला (संसदेला) आहे. अखिल भारतीय सेवेतील अधिकाऱ्यांना राज्यात महत्त्वपूर्ण प्रशासकीय पदावर ठेवण्याचा अधिकार केंद्राला आहे.

9] आंतरराज्यीय मंडळाची स्थापना :

राज्या-राज्यातील वाद सोडविण्यासाठी व त्यांच्यात सहकार्य व सद्भाव निर्माण होण्यासाठी राष्ट्रपतीला आंतरराज्यीय परिषद स्थापन करण्याचा अधिकार आहे.

या परिषदेच्या माध्यमातून राज्या-राज्यातील विवादाच्या कारणांच्या शोध घेणे आणि ते सोडविण्यासाठी योजना तयार करणे, केंद्र आणि राज्याच्या सामान्य हितसंबंधी प्रश्नांची शोध घेऊन त्यावर विचार करणे आणि जे विषय आंतर्राज्यीय संबंधात सहकार्य व समन्वय प्रस्थापित करण्यासाठी सहाय्यक असेल अशा विषयाच्या बाबतील प्रस्ताव ठेवणे इत्यादी कामे केली जातात.

10) मागासलेल्या जातीचा विकास :

अनुसूचीत जाती, जमातीव मागासलेल्या लोकांच्या विकासाठी जबाबदारी राष्ट्रपती कडे सोपाविण्यात आली आहे. राष्ट्रपती त्यांच्या परिस्थितीची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्या विकासासाठी ~~आणि~~ प्रस्ताव देण्यासाठी एका आयोगाची निर्मिती करू शकतो. आयोगाने सुचविलेल्या सुचनाची अंमलबजावणी करण्यासाठी तो राज्यांना निर्देश देऊ शकतो.

वरीलप्रमाणे केंद्र व राज्य यांच्यातील प्रशासकीय संबंधाचा आढावा घेतला हा आपल्या ~~आहे~~ असे.

Shrikrupa

लक्षात येते की प्रशासकीय क्षेत्रात केंद्र सरकारचेच वर्चस्व निर्माण झालेले आहे.

ब] विधिविषयक संबंध :- केंद्र आणि राज्य यांच्यातील विधिविषयक संबंधाचे विवेचन राज्यघटनेच्या 245 ते 255 या कलमामध्ये करण्यात आले आहे. केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यामध्ये अधिकारांचे विभाजन करण्यासाठी तीन सुची केंद्र सरकार व राज्यसरकार यांच्यामध्ये अधिकारांचे विभाजन करण्यासाठी तीन सुची सांगितल्या आहेत. केंद्रसुचीत 7 विषय समाविष्ट करण्यात आले असून त्यावर कायदे करण्याचा अधिकार केंद्रीय विधिमंडळाला (संसद) आहे. राज्यसुचीत 66 विषयांचा समावेश करण्यात आलेला असून त्यावर कायदा करण्यात आले असून त्यावर कायदा करण्यारांना आहे. परंतु केंद्र व राज्ये यांनी समवर्ती सुचीतील एखाद्या विषयावर केलेला कायदा परस्पर विरोधी असल्यास केंद्र सरकारचा कायदा श्रेष्ठ ठरतो व राज्याचा कायदा रद्द होतो.

राज्यसुची आणि समवर्ती सुचीत समावेश नसलेल्या इतर सर्व (शेष विषय) उरलेल्या विषयांवर कायदा करण्याचा अधिकार केंद्रीय विधिमंडळाला आहे.

वरील प्रमाणे केंद्र सरकारला (संसद) केंद्रसुची व समवर्ती सुचीतील विषयांवर कायदा करण्याचा करू शकते साधारणतः पुढील परिस्थितीत केंद्रिय विधिमंडळ राज्यसुचीतील विषयांवर कायदे करू शकते.

1] राज्यसभेचा ठराव :

राज्यसुचीतील एखादा विषय राष्ट्रीय दृष्टीने महत्वाचा आहे. आणि त्या विषयावर संसदेने कायदा करावे योग्य ठरेल असा ठराव राज्यसभेत उपस्थित राहून मतदान करणाऱ्या सभासदांच्या 2/3 बहुमताने मजूर केल्यास राज्यसभेतील त्या विषयांवर संसद कायदा करू शकते.

2] राज्यविधिमंडळाची विनंती :

जर दोन किंवा त्यापेक्षा अधिक घटक राज्यांनी संसदेने राज्यसुचीतील एखादया विषयावर कायदा करावा असी विनंती

केली असेल तर संसद राज्यसुचीतील विषयावर कायदा करू शकते. असा कायदा ठराव मंजुर करणारी राज्ये तर लागू करतातच. परंतु इतरही राज्ये तो कायदा आपल्या करण्याचा अधिकार प्राप्त होतो.

3] आंतरराष्ट्रीय करारांची अंमलबजावणी :-

जर भारताने दुसऱ्या देशांसोबत करार किंवा तह केलेला असेल तर ते करार तसेच आंतरराष्ट्रीय परिषदांचे निर्णय देशात लागू करण्यासाठी संसद 253 च्या कलमानुसार राज्यसुतातील कोणत्याही विषयावर कायदा करू शकते.

4] राज्यात राष्ट्रपती राजवट :-

जेव्हा एखादा घटक राज्यात राज्यघटनेनुसार शासन चालविणे अशक्य आहे. असा अहवाल त्या राज्याचा राज्यपाल केंद्र सरकारकडे पाठवितो तेव्हा त्यावर विचार करून केंद्र सरकार त्या राज्यात राष्ट्रपती राजवट लागु करते. त्यामूळे त्या राज्याचे शासन केंद्र सरकारच्या हाती येते. अशा वेळी संसद त्या राज्यासाठी राज्यसुचीतील विषयावर कायदा करू शकते.

Page No.______
Date___/___/___

5] विधेयक राष्ट्रपतीच्या मंजुरीसाठी राखुन ठेवणे :

राज्यघटनेत करण्यात आलेल्या तरतुदीनुसार राज्य विधीमंडळाने मंजुर केलेली काही विधेयक राष्ट्रपतीच्या संमतीसाठी पाठवावी लागतात. राष्ट्रपतीने त्याला नकार दिल्यास त्याचे कायद्यात रूपांतर होत नाही. तसेच काही विशिष्ट विधेयके राष्ट्रपतींच्या पुर्व संमतीशीवाय राज्य विधीमंडळात सादर करता येत नाहीत तसेच, राज्य विधीमंडळने मंजूर केलेले एखादे विधेयक राज्यपाल राष्ट्रपतीच्या संमतीसाठी राखून ठेऊ शकतो. राष्ट्रपातीने संमती नाकारल्यास ते विधेयक रद्द होते.

वरील विवेचनावर हे स्पष्ट होते. की केंद्र आणि राज्य सरकारने अधिकार राज्यघटने नुसार विभाजीत करण्यात आलेले असले तरी विशिष्ट परिस्थितीमध्ये केंद्र सरकारकडून राज्य सरकारच्या कार्यात अतिक्रमण होत असल्यामुळे विधीविषयक क्षेत्रात सुध्दा केंद्र सरकारचे वर्चस्व सिध्द होते.

## क) आर्थिक संबंध (वित्तीय) :

भारतात केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यामध्ये अधिकार व आर्थिक संसाधनाचे विभाजन करण्यात आले आहे. केंद्र सरकारला व राज्य सरकारला आपली कामे करण्यासाठी पैसा कसा व कोठून उभारायचा केंद्र सरकारची उत्पन्नाची साधने कोणती राहतील व राज्याची ~~साधने~~ उत्पन्नाची साधने कोणती राहतील याची तरतूद राज्यघटनेच्या 264 ते 291 या कलमामध्ये करण्यात आली आहे. केंद्र व राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाचे विवेचन पुढील प्रमाणे करता येते.

### i) केंद्र सरकारची उत्पन्नाची साधने :

केंद्र सरकारची उत्पन्नाची साधने अशी आहेत. रेल्वे भाडे व मालवाहतूकीचे भाडे यावरील कर संपत्ती कर व्यय कर विदेश ऋण आयात व निर्यात कर, खरेदी विक्री व जाहिरातील कर. सीमा कर वारसा कर, संपत्तीवरील वारसा कर शेतजमिनीव्यातिरिक्त व्यक्ती आणि कंपन्यांच्या भांडवलावरील कर अबकारी कर कार्पोरेशन टॅक्स, रिझर्व बँक समुद्र मार्ग किंवा

वायुमार्गाने नेण्यात येणाऱ्या वस्तुवरील कर इत्यादी.

2] राज्यसरकारची उत्पन्नाची साधने :-

राज्य सरकारची उत्पन्नाची साधने अशी आहेत. शेतीतुन मिळणाऱ्या उत्पादनावरील कर, शेत जमिनीवरील कर, वृत्तपत्राव्यातिरिक्त इतर वस्तुवरील विक्रिकर, वाहन कर मनोरंजन कर, जनावरे व नौकायवरील कर, संपत्ती कर, भुमी आणि इमारतीवरी ल कर, विजेच्या दारु अफु, भांग आणि मादक पदार्थवरील कर, पशुंच्या विक्रीवरील कर इत्यादी.

3] उत्पन्नाची विभागणी :-

काही करांची आकारणी वसुल केंद्र सरकार करु शकतो जसे- अबकारी कर, निर्यात कर, आयकर, रेल्वे भाडे इत्यादी. काही करांची आकारणी व वसुली राज्य सरकार करु शकते. जसे. शेतजमिनिच्या मालकी हक्कावरील कर, वाहन कर, मद्य पदार्थ व अन्य वस्तुंवरील विक्रि कर इत्यादी. काही कर केंद्र सरकार काढुन लावले जातात व वसुल केले. जातात. परंतु त्यातुन मिळणारे उत्पन्न केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात ते वितारीत केले जाते.

उदा. आयकर काही कर केंद्र सरकार लावते. परंतु त्याची वसुली राज्य सरकारकडून केली जाते. उदा. औषधी व प्रसाधनावरील उत्पादनशुल्क इत्यादी.

५] राज्यांना अनुदान :- केंद्र ~~सरस~~ सरकार आणि राज्य सरकार यांना प्राप्त झालेल्या उत्पन्नाच्या बाबींचा विचार केल्यास असे लक्षात येते की जास्तीत जास्त उत्पन्नाची साधने केंद्र सरकारच्या हाती आहेत. राज्यांकडे मात्र उत्पन्नाची साधने कमी आहेत. अशावेळी केंद्रसरकारकडून राज्यांना आर्थिक मदत व अनुदान देण्याची तरतुद करण्यात आली आहे. जसे बिहार, ओरिसा, आसाम व पश्चिम बंगाल या राज्यांना ताग व तागापासून तयार होणाऱ्या वस्तूंच्या निर्यात कराच्या उत्पन्नातून अनुदान दिले जाते. तसेच अनुसूचित जमातींच्या विकास योजना. केंद्रसरकारच्या संमतीने राज्यसरकारने हाती घेतला तर त्यासाठी अनुदान दिले जाते. तसेच सार्वजनिक कार्यासाठी केंद्र सरकार आपल्या महसुलातून सहाय्यक अनुदान देऊ शकते.

5) राज्यांना कर्ज देणे :

संसदेने मंजूर केलेल्या कायद्याप्रमाणे केंद्र सरकार राज्यांना कर्ज देऊ शकते. यासाठी संसदेकडून काही अटी लावल्या जाऊ शकतात. आधी घेतलेल्या कर्जाची परतफेड केल्याशिवाय दुसरे कर्ज सुद्धा दिले जात नाही अशा प्रकारचे कर्ज राज्यांनी वेगवेगळ्या कारणांसाठी दिले जाते. यामुळे केंद्र सरकारचे राज्यांवर नियंत्रण प्रस्थापीत होते.

6) नैसर्गिक संकटात मदत :

केंद्र सरकारकडून राष्ट्रपतींच्या नियंत्रणाखाली आकस्मीक निधीची व्यवस्था केली जाते दरवर्षीच्या अंदाजपत्रकात संचीत निधिसाठी ~~व्यवस्था केली जाते.~~ ~~दरवर्षीच्या~~ मोठ्या रकमेची तरतुद केंद्र सरकारकडून केले जाते. जेव्हा एखादा घटकराज्यात महापूर भुकंप दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्ती उद्भवते तेव्हा त्या घटकराज्याला केंद्र सरकार संचीत निधीतून मदत देत असते.

SEAL

7) आर्थिक संकट :

देशावर आर्थिक संकट निर्माण झाल्यास त्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राष्ट्रपतिला आर्थिक आणीबाणी घोषित करण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थितीत केंद्राकडून राज्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानावर केंद्र सरकार बंधन घालू शकते. राज्य विधिमंडळाने मंजूर केलेले अर्थविधेयक राष्ट्रपतींच्या स्विकृतीसाठी पाठविण्यात येऊ शकते.

8) वित्त आयोगाची निर्मिती :

दर पाच वर्षांनी राष्ट्रपती वित्त आयोगाची निर्मिती करीत असतो. केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात उत्पन्नाची विभागणी व सहाय्यक अनुदान देण्यासाठी आधारभुत तत्वे इत्यादींबाबतच्या शिफारशी वित्त आयोग करु शकते.

9) नियंत्रक व महालेखा परिक्षक :

केंद्र आणि राज्य सरकारच्या आय-व्यय हा व्यवस्थीत पध्दतीने होण्यासाठी आणि त्यांनी केलेल्या खर्चाची तपासणी करण्यासाठी नियंत्रक व महालेखा परिक्षकाची नियुक्ती राष्ट्रपतीकडून केली जाते. राज्यांनी केलेल्या खर्चाची चौकशी

Page No.
Date / /

करून तसा अहवाल तो राष्ट्रपतीकडे पाठवित असतो. त्यामुळे केंद्र सरकारचे राज्यांवर नियंत्रण प्रस्थापित होते.
केंद्र व राज्य यांच्यातील आर्थिक संबंधाचा विचार केल्यानंतर आपल्या लक्षात येते की उत्पन्नांची जास्तीत जास्त साधने केंद्र सरकारच्या हाती असून राज्यांना नेहमी केंद्र सरकारवर आर्थिक मदतीसाठी अवलंबून रहावे लागते. थोडक्यात आर्थिक क्षेत्रात सुध्दा केंद्र सरकारचेच वर्चस्व निर्माण झाले आहे

SEAL

२] राज्यमंत्रीमंडळाचे अधिकार, कार्ये व भुमिका स्पष्ट करा.

⇒ वास्तविक कार्यकारी मंडळ म्हणून मंत्रीमंडळाला पुढील कार्य करावी लागतात.

i] धोरण ठरविणे :

देशाच्या धोरणांची निश्चिती करणे हे मंत्रीमंडळाचे प्रमुख कार्य आहे. राज्याचे धोरण मंत्रीमंडळाकडून निर्माण केले जाते. व त्याची अंमलबजावणी सुध्दा मंत्रीमंडळ करीत असते. निवडणूकीच्या काळात लोकांना अनेक प्रकारची आश्वासने राजकीय पक्षांकडून दिली जातात. निवडून आल्यानंतर ती पूर्ण करण्यासाठी त्या प्रकारचे धोरण त्यांच्या कडून निर्माण केले जाते. व त्या धोरणाला विधिमंडळाची मंजूरी मिळवून हे अंमलात आणण्याचे कार्य मंत्रीमंडळ करीत असते.

२] प्रशासन विषयक कार्ये :

दैनंदिन प्रशासनावर नियंत्रण ठेवून राज्यकारभाराचे संचालन करणे हे मंत्रीमंडळाचे प्रमुख कार्य आहे. शासनाचे कार्य व्यवस्थितपणे पार पाडावे यासाठी वेगवेगळे खाते निर्माण करून प्रत्येक खात्यासाठी एक मंत्री नियुक्त केला जातो. त्यांच्या मदतीस काही.

SEAL

राज्यमंत्री व काही उपमंत्री व काही उपमंत्री व प्रचंड संख्येने प्रशासकीय नोकरवर्ग असतो. आपल्या खात्याच्या कारभाराबाबत तो मंत्री संपूर्ण मंत्रीमंडळासह विधानसभेला जबाबदार असतो प्रशासनाच्या यशापयशाची संपूर्ण जबाबदारी मंत्रीमंडळाची असते.

3] विधिविषयक कार्य :-

मंत्रीमंडळातील सर्व मंत्री विधीमंडळाचे सभासद असतात. त्यामुळे कायदे मंडळाच्या कामकाजांत ते भाग घेतात अनेक विधेयके मंत्रिमंडळाकडूनच मांडली जातात. बहुमताच्या आधारावर ते मंजूर करून घेतले जातात. कायदेनिर्मितीच्या प्रक्रियेवर मंत्रीमंडळाचेच नियंत्रण असते. इतर सदस्यांनी मांडलेली विधेयके मंत्रिमंडळाच्या समर्थनाशिवाय मंजूर होऊ शकत नाही.

4] अर्थविषयक कार्ये :-

राज्यघटनेने राज्यपालाला दिलेल्या आर्थिक सत्तेचा वापर प्रत्यक्षात मंत्रीमंडळाकडून केला जातो आपल्या राज्याचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करण्याचे कार्य मंत्रीमंडळाकडून (अर्थमंत्री) केले जाते.

राज्याच्या संपूर्ण अर्थव्यवस्थेवर त्यावर सविस्तर चर्चा व विचार विमर्श केला जातो. प्रस्थापित वर्षातील उत्पन्न व खर्च लक्षात घेऊन पूर्ण वर्षासाठी योजना तयार करण्याचे कार्य मंत्रीमंडळ करीत असते.

5) समन्वयविषयक कार्य :- प्रशासन कार्य व्यवस्थीरीतेने करता यावे यासाठी शासनाचे विभिन्न विभाग निर्माण केले जातात त्या विभागांमध्ये समन्वय प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रिमंडळाला करावे लागते. विभिन्न विभागाला एखादा प्रश्नावर निर्णय घेणे अशक्य असेल तर तो प्रश्न मुख्यमंत्र्याकडे सोपविला जातो मुख्यमंत्री त्या विभागांमध्ये समन्वयाचे कार्य करतो. शासनाच्या विविध विभागाला मार्गदर्शन करून त्यांच्या कामात समन्वय प्रस्थापित करण्याचे कार्य मंत्रीमंडळ करीत असते.

6) नियुक्तीसंबंधी कार्य :- घटकराज्यातील महत्वपूर्ण पदांवर उच्च पदाधिकाऱ्यांची नियुक्ती राज्यपालाच्या नावाने मंत्रीमंडळाकडून केली जाते. उदा. राज्याचा महाधिवक्ता राज्यलोक सेवा.

Page No.
Date / /

SEAL

आयोगांच्या अध्यक्ष व सदस्य, राज्य निवडणूक आयुक्त जिल्हा व सत्र न्यायाधिश राज्याचा लेखापरिक्षक इत्यादींच्या नियुक्त्या राज्यपालाच्या नावाने मंत्रीमंडळाकडून केल्या जातात.

7) इतर कार्य :-

भारतात कल्याणकारी राज्याची कल्पना साकार करण्याचे ठरविण्यात आल्यामुळे इतर कार्याची जबाबदारी मंत्रिमंडळावर असते, पुरामुळे निर्माण होणारी परिस्थिती, दुष्काळी परिस्थिती, सामना करणे व त्यावर उपययोजना करणे, भुकंप, साथीचे आजार अशाप्रकारे अचानक निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी उपाययोजना मंत्रीमंडळाला करावी लागते.

अशाप्रकारे राज्य घटनेने घटकराज्याचा कारभार चालवीण्यासाठी राज्यपालाला दिलेल्या सर्व अधिकारांच वापर मंत्रीमंडळाकडून केला जातो. यशापयशांची संपूर्ण जबाबदारी मंत्रीमंडळाची असते.

SEAL

३] मंत्रीमंडळाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा

⇒ I] सामुहिक जबाबदारी :- भारतीय राज्यघटनेच्या 164 (2) कलमानुसार राज्याचे मंत्रीमंडळ विधानसभेला सामुहिकरित्य जबाबदार राहते. जोपर्यंत विधानसभेचा मंत्रीमंडळावर विश्वास असतो तोपर्यंत मंत्रीमंडळ अधिक पदावर असते. मुख्यमंत्री आपल्या सर्व मंत्र्यांना विश्वास घेऊन विधानसभेला जबाबदार राहतो. मंत्रीमंडळातील सर्व मंत्री एकमेकाला जबाबदार राहतात. त्यामुळे एखादा मंत्र्याविरुध्द विधान सभेत टीका होऊ लागली तर सर्व मंत्री वेळप्रसंगी त्या मंत्र्याला वाचविण्यासाठी राजीनामा देण्यास तयार असतात. एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक अशा पध्दतीने मंत्रीमंडळ सामुहिकरित्या विधानसभेला जबाबदार राहते.

विधानसभेत मंत्रीमंडळाविरुध्द अविश्वासाचा ठराव संमत झाला तर मंत्रीमंडळ राजीनामा देते. त्यामुळेच मुख्यमंत्री नेहमी विधानसभेच्या जबाबदार राहून कार्य करीत असतो. तो आपल्या सर्व मंत्र्यांना विश्वासात.

घेतो. वेळोवेळी मंत्रीमंडळाच्या परिषद घेऊन तो सर्व मंत्र्यांत ऐक्य व एकजिनसीपणा निर्माण करतो. थोडक्यात, सामूहिक जबाबदारी हा संसदीय शासनपध्दतीचा आत्मा आहे. असे म्हणतात. येईल. सामुहिक जबाबदरीच्या तत्वाला तडा गेला तर मंत्रिमंडळाचे अस्तित्व धोक्यात येते.

२) गोपनियता (गुप्तता) :

मंत्रीमंडळाच्या बैठकील घेण्यात येणारे निर्णय ठराव यासंबंधी गुप्तता बाळगावी लागते. प्रत्येक मंत्री पदग्रहण करते वेळी गुप्ततेची शपथ घेत असतो. मंत्रीमंडळाच्या बैठका गुप्त असतात. मुख्यमंत्र्याने निर्णय घोषीत केल्याशिवाय त्यासंबंधी बोलू नये असे गुप्ततेचे बंधन प्रत्येक मंत्र्यावर असते.

३) एकाजिनसीपणा :

मंत्रीमंडळातील मंत्री एकाच राजकीय पक्षाचे असतात. त्यामुळे त्यांच्यात एकजितसीपणा ऐक्य आढळून येते. सर्व मंत्री मुख्यामंत्र्याच्या अध्यक्षतेखाली एका येऊन एकमुखी निर्णय घेतात. परस्परांचे सहकार्य, सद्भाव, सादरे

प्रत्येक निर्णय एकमताने घेतला जातो. त्यामुळे मंत्रीमंडळाच्या कार्यात ऐक्यभाव व एकजिनसीपणा निर्माण होतो. सामुहिक जबाबदारीने कार्य करण्यासाठी आणि विधानसभा विश्वास संपादन करण्यासाठी एकजिनसीपणा आवश्यक असतो.

5) वास्तववादी सत्ता प्रमुख मुख्यमंत्री :-

घटक राज्याच्या कार्यकाचे प्रमुख राज्यपाल असतो, परंतु तो मंत्रीमंडळाच्या बैठकींना हजर राहात नाही. राज्यपाल हा मंत्रीमंडळाच्या बाहेर असतो. प्रत्यक्षात मुख्यमंत्री व त्याचे मंत्रीमंडळ सर्व निर्णय घेत असतात. राज्यपाल हा नामधारी घटनात्मक प्रमुख असतो. मुख्यमंत्री वास्तववादी प्रमुख असतो. तो मंत्रीमंडळाचा नेता असतो, सत्तारूढ पक्षाचा नेता असतो मुख्यमंत्र्याचे. नेतृत्व आणि कार्यक्षमता मंत्रीमंडळाचे एक वैशिष्ट्ये मनाने लागेल.

Principal
(…) Birla Arts & Commerce
College, Shah Nagar, Nagpur-15
SEAL